**नियमित दिवाणी दावा क्र.२६/२०१९**
**निशाणी ४४ वरील आदेश**
**( जयंत वेटे वि. वासूदेव वेटे व.५)**
**सी.एन.आर.क्र.एमएचएसआय०५-०००००९९-२०१९**

१. प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादी क्र.४ यांनी मूळ दावेचेकामी कैफियत वेळेत न दिलेने त्यांचेविरुध्द दि.२३/१०/२०१९ रोजी झालेला विना कैफियत आदेश रद्द होवून त्यांची कैफियत याकामी सामील करुन घेणेबाबत दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादींच्या मते, सदर दाव्याचे कामी प्रतिवादी क्र.४ यांना दाव्याचे समन्स प्राप्त झाले. मात्र कैफियत दाखल करणेसाठी मुदत मागून घेतलेली होती. वादीने दाखल केलेल्या दाव्याचे स्वरुप पाहता त्याबाबत कैफियत दाखल करणेसाठी आवश्यक असलेली कागदपत्रे प्रस्तुत प्रतिवादी यांना संबंधीत खात्याकडून वेळेवर प्राप्त नाही. तसेच दरम्यानच्या काळात कोव्हीड-१९ महामारीमुळे प्रतिवादी नं.४ हिला कागदपत्रे मिळणेस बराच कालावधी लागला. त्यातच मध्यंतरी प्रतिवादी क्र.४ हिचे पती कॅन्सरच्या विकाराने आजारी होते व त्यांचेवर मुंबई येथे ब्रिच कॅन्डी हॉस्पीटमध्ये शस्त्रक्रिया झालेली असल्याने व त्याच्या पुढील उपचारासाठी प्रतिवादी क्र.४ यांना तिच्या पतींना घेवून वारंवार मुंबई येथे जावे लागत होते व आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. ४ यांना दाव्याचे कामी मुदतीत कैफियत दाखल करता आलेली नाही.

३. प्रतिवादींचे पुढे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र.४ यांनी दावा मिळकतीपैंकी अ.नं.१ ते ५ चे संपूर्ण क्षेत्र व अ.नं. ६ पैंकी ०-०२-१ एवढे क्षेत्र हे वादी नं. १ चे आजोबा यांचेकडून सन २०१४ साली विक्रीत घेतलेली आहे. सदर खरेदीखतान्वये सदर दावा मिळकती प्रतिवादी क्र. ४ हिच्या प्रत्यक्ष कब्जाला भोग्यात व वहिवाटीत आहेत. वादीने सदर दाव्यात खरेदीखत आपणावर बंधनकारक नाही असा ठराव करुन मागितला असून प्रतिवादी क्र. ४ च्या खरेदीत घेतलेल्या मिळकतीमध्ये आपला हिस्सा ठरवून वाटप मागत आहे. सबब प्रस्तुत दाव्यामध्ये

प्रतिवादी क्र. ४ हिच्या दावा मिळकतीच्या हक्कांच्या अनुषंगाने प्रतिवादीतर्फे तोंडी व कागदोपत्री पुरावा देणे तसेच प्रस्तुतचा दावा हा गुणदोषावर चालविणे अत्यंत आवश्यक व महत्त्वाचे असून पुराव्याच्या अनुषंगाने प्रस्तुत प्रतिवादीचे कैफियतीद्वारे प्लिडींग येणे आवश्यक आहे. अन्यथा प्रतिवादी क्र. ४ कडे तिच्या बचावाच्या अनुषंगाने आवश्यक असलेला सबळ पुरावा असताना देखील केवळ कैफियतीअभावी त्यांना तो दाव्याचे कामी सादर करता येणार नाही व तसे झाल्यास प्रतिवादी नं. १ यास दावा मिळकतीतील हक्कास बाधा येणारी असून त्यांचे अपरिमित स्वरुपाचे असे नुकसान होणारे आहे. सबब, नैसर्गिक न्यायतत्वांचा विचार करुन प्रतिवादी क्र. ४ हिचे विरुध्द विना कैफियत चौकशीचा झालेला आदेश रद्द होणे आवश्यक व अनिवार्य आहे. सबब, प्रतिवादी क्र. ४ हिने मुदतीत कैफियत दिलेली नसल्यामुळे त्यांचेविरुध्द करणेत आलेला विना कैफियत चौकशीचा आदेश रद्द करुन त्यांची कैफियत दाखल करुन घेणेत यावी अशी विनंती केलेली आहे.

४. प्रस्तुत अर्जास वादीतर्फे म्हणणे असे की, सदरकामी प्रतिवादी क्र. ४ यांनी विहित मुदतीत कैफियत न दिल्याने व कारण संयुक्तिक नसल्याने प्रतिवादी क्र. ४ यांचा अर्ज खर्चासहित फेटाळण्यात यावा असे कथन केलेले आहे.

५. प्रतिवादी क्र. ४ यांचा अर्ज त्यास वादीतर्फे विधीज्ञांनी दिलेले म्हणणे तसेच दोन्ही बाजुंचा युक्तीवाद यांचा विचार करून खालील मुद्दे माझे विचारार्थ आले असून त्यावरील निष्कर्ष खालील प्रमाणे नोंदविण्यात येत आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | प्रतिवादी क्र. ४ यांचा सदरचा अर्ज मंजूर करण्यास पात्र आहे का? | होय. |
| २. | आदेश काय? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## का र ण मि मां सा

**मुद्दा क्र. १ बाबतः—**

६. अर्ज व म्हणणे वाचले. प्रस्तुत अर्जात नमूद कारणे अभिलेख पाहता संयुक्तिक वाटत नाहीत. प्रतिवादी क्र.४ यास पुरेशी संधी देवून देखील त्यांनी दाव्याचे कामी आपली कैफियत दिलेली दिसून येत नाही. परंतु, याकामी जर प्रतिवादी यास आपली बाजू मांडण्याची संधी न दिलेस त्याच्या हक्कास तो मुकणार आहे. ही बाब खरी आहे की, प्रतिवादी यांनी सदर कामी कैफियत दाखल करणेस विलंब केलेला आहे. परंतु तो विलंब वादी यास खर्च देवून भरून निघू शकतो तसेच नैसर्गिक न्यायतत्त्वाचा विचार केला असता सदरचा अर्ज मंजूर करणे योग्य ठरेल. सबब, मी या निष्कर्षापर्यंत येत आहे की, सदरचा प्रतिवादी क्र. ४ यांचा अर्ज मंजूर होणेस पात्र असल्याने मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी देवून मुद्दा क्र.२ चा निष्कर्ष देणेकरीता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## आदेश

प्रतिवादी क्र.४ याचा अर्ज वादी यास रक्कम रू. ३००/— (रू. तीनशे मात्र) खर्च देणेचे अटीवर मंजुर करणेत येत आहे.

सही/-

दिनांकः—०६/०१/२०२३.

(डी.वाय.रायरीकर)

सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), वेंगुर्ला.